नवराष्ट्र पेपर

# सपकाळ महाविद्यालयात सायबर सुरक्षा कार्यशाळा

16-10-23

अकोट, (ता. प्र.). येथून जवळच असलेल्या पाथर्डी येथील निळकंठ सपकाळ कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सुरक्षेबाबत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनात सुमित सपकाळ व अनिकेत भुडके या विध्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेबाबत, ऑनलाइन फसवणूक, वाढता सोशल मीडियाचा वापर त्यामधून होणारी फसवणूक, आपण करीत असलेली ऑनलाइन खरेदी इत्यादी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक नंदकिशोर मेतकर होते. यावेळी हा कार्यक्रम क्विक हिल फाउंडेशन पुणे व महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने व अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू, भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा म्हणजे काय? आणि सायबर क्राईमचे कोणते प्रकार पडतात? वाढत्या सोशल मीडियाच्या माध्यमातून ऑनलाइन खरेदीची फसवणूक कशी होते? फेसबुक अकाउंट हॅक कसे केले जाते, फेक वेबसाइट्स कशा ओळखाव्या, एटीएम पासवर्ड, ओटीपी याबाबत फसव्या लिंकपासून दूर राहणे आदींविषयी याबाबत अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे विद्यार्थी सुमित सपकाळ व अनिकेत भुडके यांनी योग्य मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

